MHNS140015722025

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.५६/२०२५
श्री. गोविंद हरी भोये व इतर वि.
कोणीही नाही.

## निशाणी क्र. ०१ वरील आदेश
## (दिनांक १० मार्च, २०२६ )

प्रस्तूतचा अर्ज अर्जदार यांनी मुंबई विनियमन अधिनियम १८२७ (Bombay Regulation Act 1827) अन्वये दाखला (Heirship Certificate) मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**अर्जदार यांचे थोडक्यात कथन की,**

**०२.** अर्जदारांचे मुळ पुरुष बाळु काळु भोये यांना त्यांचे मृत्युपश्चात त्यांना मुलगा रावजी, अर्जुन, पांडू, काशिनाथ, गंगा, हरी असे वारस असून सदर वारसांपैकी रावजी हे ०३/०१/१९९१ रोजी मयत झालेले असून त्यांना त्यांचे मृत्युपश्चात वारस तुळशिराम, नामदेव, आनंदीबाई व सिताबाई असे वारस असून पैकी तुळशिराम व त्यांची मुलगी विमल हे दोघेही मयत झालेले असून त्यांना त्यांचे मृत्युपश्चात एकमेव वारस मुलगा सागर अर्जदार नं.२४ हाच एकमेव वारस आहे. तसेच मयत रावजी वारस नामदेव, आनंदी व सिताबाई ह्या मयत झालेल्या असून त्यांना त्यांचे मृत्युपश्चात कोणीही वारस नाहीत. तसेच मयत पांडू बाळु भोये, काशिनाथ बाळु भोये व गंगा बाळु भोये हे मयत झालेले असून त्यांना त्यांचे मृत्युपश्चात अर्जदारांव्यतिरिक्त कोणीही जवळचे वारस नाहीत. तसेच हरीबाळू भोये हे मयत झालेले असून त्यांचे मृत्युपश्चात त्यांना अर्जदार नं.१ गोविंद तसेच नामदेव व जनार्दन अशी वारस मुले असून पैकी वारस मुलगा गोविंद हे आज मितीस हयात असून सदर वारस मुलांपैकी नामदेव हरी भोये हे दिनांक ०८/०२/२०२२ रोजी मयत झालेले आहे व त्यांना त्यांचे मृत्युपश्चात अर्जदार नं.८ ते १३ अशी कायदेशीर वारस आहेत. तसेच जनार्दन हरी भोये हे दिनांक ०२/१२/२०२२ रोजी मयत झालेले असून त्यांचे मृत्युपश्चात त्यांना अर्जदार नं.१४ ते २३ असे

कायदेशिर वारस आहे. तसेच अर्जुन बाळू भोये हे दिनांक १२/०२/२००६ रोजी मयत झालेले असून त्यांना त्यांचे मृत्युपश्चात विठ्ठल, कमळाबाई व नर्मदाबाई अशी कायदेशिर वारस असून पैकी अर्जदार क्र.२ नर्मदाबाई ह्या आज मितीस हयात आहेत व सदर वारसांपैकी वारस मुलगा विठ्ठल हे दिनांक ०४/०६/२०२० रोजी मयत झालेले असून त्यांना त्यांचे मृत्युपश्चात अर्जदार नं.३ ते ५ असे कायदेशिर वारस आहेत. तसेच कमळाबाई ह्या देखील मयत झालेल्याअसून त्यांना त्यांचे मृत्युपश्चात अर्जदार नं.६ व ७ हे कायदेशिर वारस आहेत. अर्जदारांचे मयत वडील व आई हे देखील मयत झालेनंतर त्यांचा अंत्यविधी, व त्यांचे हिंदु धर्म शास्त्राप्रमाणे करावे लागणारे इतर सर्व धार्मिक विधी हे अर्जदारांनी पार पाडलेले होते व आहेत. मयत पांडु बाळु भोये, काशिनाथ बाळु भोये व गंगा बाळु भोये यांच्या मृत्युपश्चात त्यांना अर्जदार क्र.१ ते २४ हेच कायदेशीर वारस असुन त्यांच्या शिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

०३. अर्जदार यांच्या वडीलोपार्जीत सामाईक मालकीच्या मौजे सादळपाडा, ता. सुरगाणा, जि. नाशिकयेथे शेतजमिन गट नं.५५, गट नं.४५ तसेच मौजे जाहुले, ता. सुरगाणा, जि. नाशिक या गावचे शिवारात शेतजमीन गट नं.३९, गट नं.२२, गट नं.२५, गट नं.२६, गट नं.३२ अशा अर्जदारांच्या वडीलोपार्जीत सामाईक मालकीच्या शेत जमीनी आहेत. सदर शेतजमीनींना आज पावेतो अर्जदारांचे वडीलांचे भाऊ पांडु बाळू भोये, काशिनाथ बाळु भोये व गंगा बाळु भोये यांची नावे लागलेली असुन ते मयत झालेले आहेत. पांडु, काशिनाथ व गंगा यांना पत्नी, मुले अशी वर्ग-१ ची वारस नाहीत. त्यामुळे अर्जदार हे वर्ग-२ चे वारस असल्याने अर्जदार यांना सदर मयत व्यक्तिंचे नावे कमी करुन अर्जदार यांची नावे त्यांचे वारस म्हणून दाखल करणेकामी त्यांना वारस दाखल्याची आवश्यकता आहे. सदर वर नमुद व्यक्तिंची मृत्युपश्चात अर्जदार क्र.१ ते २४ हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखल्याची अर्जदार क्र.१ ते २४ यांना आवश्यकता आहे. सबब, अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०४. पांडु बाळू भोये, काशिनाथ बाळु भोये व गंगा बाळु भोये यांचे मृत्यु पश्चात

अर्जदार क्र.१ ते २४ हे सरळ व कायदेशीर वारस आहेत किंवा काय याबाबत दिनांक १३/११/२०२५ रोजीचे "दैनिक गांवकरी" या वर्तमानपत्रात जाहीर नोटीस व जाहीरनामा (निशाणी क्र.७) प्रसिध्द करुन हरकती मागविण्यात आल्या.

**०५.** अर्जदार क्र.१ श्री. गोविंद हरी भोये यांनी अर्जातील त्यांच्या कथनाचे पृष्ठ्यर्थ त्यांचे पुराव्यांचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.१० वर दाखल केलेले आहे. अर्जदार यांनी त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्रात अर्जातील सर्व कथनांचा पुनःरुच्चार केलेला आहे व अर्जदार क्र.१ ते २४ हेच मयत पांडु बाळू भोये, काशिनाथ बाळु भोये व गंगा बाळु भोये यांचे कायदेशीर वारस असुन इतर कोणीही वारस नसल्याबाबत सत्य प्रतिज्ञेवर कथन केले आहे.

**०६.** अर्जदार यांनी त्यांच्या तोंडी पुराव्याचे पृष्ठ्यर्थ कागदोपत्री पुराव्यात पांडु बाळू भोये यांच्या मृत्यु दाखल्याची मुळ प्रत, काशिनाथ बाळु भोये यांच्या मृत्यु दाखल्याची मुळ प्रत, गंगा बाळु भोये यांचा यांच्या मृत्यु दाखल्याची मुळ प्रत, अर्जुन बाळू भोये यांच्या मृत्यु दाखल्याची मुळ प्रत, हरी बाळू भोये यांच्या मृत्यु दाखल्याची मुळ प्रत, विठ्ठल अर्जुन भोये यांच्या मृत्यु दाखल्याची मुळ प्रत, कमळाबाई अर्जुन भोये उर्फ कमळीबाई मोहन खुरकुटे यांच्या मृत्यु दाखल्याची मुळ प्रत, नामदेव हरी भोये यांच्या मृत्यु दाखल्याची छायांकित प्रत, जनार्दन हरी भोये यांच्या मृत्यु दाखल्याची मुळ प्रत, मौजे सायळपाडा, ता. सुरगाणा येथील गट नं.५५ व गट नं.४५ चा ७/१२ ऊता-यांची ऑनलाईन प्रत, मौजे जाहुले, ता. सुरगाणा येथील गट नं.३९, गट नं.२२, गट नं.२५, गट नं.२६ व गट नं.३२ चे ७/१२ ऊता-यांची ऑनलाईन प्रत, रावजी बाळु भोये यांच्या मृत्यु दाखल्याची प्रत, गंगुबाई तुळशीराम भोये यांच्या मृत्यु दाखल्याची प्रत, सिता रावजी भोये यांच्या मृत्यु दाखल्याची प्रत, नामदेव रावजी भोये यांच्या मृत्यु दाखल्याची प्रत, आनंदी रावजी भोये यांच्या मृत्यु दाखल्याची प्रत, तुळशीराम रावजी भोये यांच्या मृत्यु दाखल्याची प्रत, विमल प्रल्हाद बागुल यांच्या मृत्यु दाखल्याची प्रत ईत्यादी कागदपत्र दाखल केलेले आहेत. अर्जदार यांनी निशाणी क्र.११ वर पुरसिस दाखल

करुन त्यांची पुराव्याची बाजु बंद केली.

**०७.** उपरोक्त लेखी व तोंडी पुराव्याचे अवलोकन केले असता तसेच प्रकरणात दाखल केलेल्या कागदपत्रांची पाहणी केली असता असे दिसुन येते की, पांडु बाळू भोये हे दिनांक १२/०६/१९९० रोजी, काशिनाथ बाळु भोये हे दिनांक ०७/०९/२००६ रोजी व गंगा बाळु भोये हे दिनांक १०/०१/१९८५ रोजी मयत झालेले आहेत. दिनांक १३/११/२०२५ रोजीचे ''दैनिक गांवकरी'' वर्तमानपत्रात दिलेली जाहीर नोटीस व जाहीरनामा नोटीस (निशाणी क्र.७) प्रसिध्द करुन हरकती मागविण्यात आल्या. तथापि, अर्जदार क्र.१ ते २४ यांचे लाभात वारस दाखला देण्याकरीता कोणीही हरकत नोंदविल्या नाहीत. सबब, भाऊ पांडु बाळू भोये, काशिनाथ बाळु भोये व गंगा बाळु भोये हे मयत झाल्यामुळे अर्जदार क्र.१ ते २४ हे त्यांचे कायदेशीर वारस असल्याचे सिध्द होते. करीता, अर्जदार क्र.१ ते २४ यांच्या नावे वारस मान्यता प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळण्यास अर्जदार क्र.१ ते २४ पात्र आहेत. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्र.१ ते २४ हे मयत भाऊ पांडु बाळू भोये, काशिनाथ बाळु भोये व गंगा बाळु भोये यांचे कायदेशीर वारस आहेत असा दाखला (Heirship Certificate) नियमाप्रमाणे योग्य ते न्यायालयीन शुल्क आकारुन देण्यात यावे.

३. संचिका बंद करण्यात येते.

SHRUTI CHANDRAKANT NIRMALE

Digitally signed by SHRUTI CHANDRAKANT NIRMALE
Date: 2026.03.13 17:28:14 +0530

दिनांक १०/०३/२०२६

( एस. सी. निर्मळे)
दिवाणी न्यायाधिश, क.स्तर,
दिंडोरी.